**Lokmat 04.05.20**

# विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात कोरोना वॉरिअर्सचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

विमाननगर : सैन्य कार्यक्रम अंतर्गत कोरोना वॉरियर्स म्हणून पुणे शहर पोलिसांचा विशेष गौरव करत कृतज्ञता व्यक्त केली. विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात हा कार्यक्रम झाला.

बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुप आणि सेंटरचे ब्रिगेडिअर एम. जे. कुमार तसेच सेनादलाचे इतर अधिकारी यांनी विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे हा विशेष सन्मान केला. पुणे शहर आयुक्तालयातील सर्वपोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी कोरोना आजाराच्या पार्श्वभूमीवर शहरात केलेल्या खडतर, उल्लेखनीय कामाचे कौतुक सैन्य दलाच्या वतीने यावेळी करण्यात आले. सेनादलाचे प्रमुख मेजर जनरल बिपिन रावत यांचा आर्मी वॉरियर्स सल्यूट कोविड वॉरियर्स हा संदेश व्हीईजी ग्रुपच्यावतीने पुणे पोलिसांना देण्यात आला. पुणे पोलिसांच्या उत्कृष्ट कामगिरीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी व पोलीस दलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सैन्य



दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वत: हजर राहून पुणे पोलिसांचा गौरव केला. सेनादल प्रमुखांचा महत्वपूर्ण संदेश यावेळी सेना दलाच्या वतीने वाचून दाखविला.

यावेळी पोलीस उपआयुक्त पंकज देशमुख, पोलीस निरीक्षक रवींद्र कदम, सहायक पोलीस निरीक्षक, संदीप यादव, पोलीस उपनिरीक्षक लहू सातपुते यांच्यासह विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सेना दलाच्या अधिकाऱ्यांनी यावेळी विश्रांतवाडी पोलिसांना पुष्पगुच्छ, भेटवस्तू तसेच अभिनंदनाचा फलक भेट दिला.

**Lokmat 04.05.20**



पुणे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांचा लष्करी अधिकाऱ्यांकडून सन्मान करण्यात आला.

# लष्करी अधिकाऱ्यांकडून कोरोनायोद्ध्यांचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोना विषाणूविरोधातील लढ्यात पुणे पोलिसांनी केलेल्या कामगिरीचा सन्मान भारतीय लष्कराकडून आज करण्यात आला. मेजर जनरल नवनीत कुमार, कर्नल अनुप वाघोरे व त्यांचे सहकारी रविवारी सकाळी पुणे पोलीस आयुक्तालयात आले. त्यांनी पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांची भेट घेऊन त्यांच्या कामाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या वेळी सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अप्पर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त वीरेंद्र मिश्र, बच्चनसिंग, सहायक पोलीस आयुक्त मिलिंद देशमुख उपस्थित होते.

त्यांनी शहरातील प्रमुख पोलीस अधिकारी तसेच लष्कराचे प्रमुख अधिकारी यांची छायाचित्रे असलेला केक आणला होता. या वेळी केक कापण्यात आला. पुणे शहर पोलीस करत असलेल्या कामगिरीबाबत नवनीत कुमार यांनी पोलिसांचे आभार मानले. अशाच प्रकारे पुणे शहरातील इतर सहायक पोलीस आयुक्त कार्यालयात इतर लष्कराच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन पोलिसांच्या कामाबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

**Loksatta 01.05.20**

# ३२ पोलिसांना सन्मानचिन्ह

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पुणे पोलीस दलातील ३२ पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला जाहीर करण्यात आले. यंदाच्या वर्षी राज्यातील अधिकारी आणि कर्मचारी अशा ८०० जणांना महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर करण्यात आले.

सन्मानचिन्ह जाहीर झालेल्यांमध्ये राज्य दहशतवादी विरोधी पथकाच्या (एटीएस) पुणे विभागातील सहायक पोलीस आयुक्त सुनील यादव यांचा समावेश आहे. महाराष्ट्र पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलिसांना दरवर्षी महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर करण्यात येते. यंदाच्या वर्षी राज्यातील ८०० पोलीस कर्मचाऱ्यांना महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर करण्यात आले आहे.त्यात पुणे पोलीस दलातील ३२ जणांचा समावेश आहे. वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील तसेच पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, पोलीस निरीक्षक संतोष बर्गे यांना सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे.

शहर पोलीस दलातील महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे- अविनाश ढमे, बाळासाहेब अंतरकर (उपनिरीक्षक), संभाजी नाईक, भरत मोरे, दिलीप पोटे, शशिकांत शिंदे, माणिक पवार, अशोक सणस, संजय चांदणे, दिलीप मोरे, संतोष पागार, अस्लम अत्तार, महादेव निंबाळकर, प्रदीप शहारे, विजय भोसले, विकास शिंदे, जिलाजी मोमीन, सुनील बोरकर, दिलीप वाळके, संतोष मोहिते, गोपाळ खांदवे, राकेश गुजर, साक्षी मुळे, राहुल शिंदे, विनोद साळुंके, अतुल गायकवाड, मंगेश चव्हाण, सुधीर इंगळे, नारायण पवार.

Prabhat 15.05.20

# मजूर म्हणू लागले... 'महाराष्ट्र पोलीस जिंदाबाद'

## विश्रांतवाडीतून पुणे पोलिसांच्या मदतीने परप्रांतीय मध्य प्रदेशला रवाना

येरवडा, दि. १४ (प्रतिनिधी) - केंद्र सरकारने लॉकडाऊनचा तिसरा टप्पा घोषित केल्यानंतर परप्रांतीय कामगारांचा धीर सुटला. राज्यासह पुण्यातूनही परप्रांतीयांचे तांडे त्यांच्या मूळ गावी निघाले असता त्यांच्या मदतीकरता पोलीस सरसावले. मुंबई, नाशिक येथे पोलिसांच्या नावाने शिव्यांची लाखोली वाहणारे हेच पोलीस पुण्यात 'महाराष्ट्र पोलीस जिंदाबाद'च्या घोषणा देताना दिसून आले. मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश या त्यांच्या मूळ गावी जाण्यासाठी पुणे पोलीस करीत असलेल्या मदतीमुळे

हे परप्रांतीय मजूर आता अक्षरश: भारावून गेले आहेत.

पुणे शहर पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस आयुक्त सुनील फुलारी, पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त लक्ष्मण बोराटे यांनी दिलेल्या सूचनेनुसार परप्रांतीय मजुरांना त्यांच्या मूळ गावी जाण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे. यानुसार विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथून अतिरिक्त पोलीस आयुक्त सुनील फुलारी यांच्या उपस्थितीत मध्य प्रदेश या ठिकाणी बुधवारी (दि.१३) मजुरांना घेऊन सात बसेस रवाना झाल्या. तत्पूर्वी विश्रांतवाडी पोलीस स्टेशन



याठिकाणी डॉ. वाडेकर यांच्या मदतीने परप्रांतीय मजुरांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

या बस रवाना होताना मजुरांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी 'महाराष्ट्र पोलीस जिंदाबाद'च्या जोरदार घोषणा दिल्या. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड, गुन्हे निरीक्षक रवींद्र कदम, राज्य परिवहन मंडळाचे शिवाजीनगर आगारप्रमुख सुनील भिसे, सामाजिक कार्यकर्ते सुहास टिंगरे उपस्थित होते.

पुणे शहरात दीड महिन्यापासून अडकून पडल्याने परप्रांतीय मजुरांचे पोटपाण्याचे हाल होत होते. त्यातच लॉकडाऊन वाढणार असल्याने या मजुरांनी त्यांच्या मूळ गावी पायी जाण्याचा निर्णय घेतला होता.

ही बाब लक्षात येताच त्यांच्या मदतीसाठी पुणे शहर पोलीस दल सरसावले. शहरातील प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्दीत राहणाऱ्या परप्रांतीय मजुरांच्या नोंदी सुरू करण्यात आल्या. यासोबतच त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. जीवनावश्यक साहित्य तसेच चहा, नाश्ता, जेवण देखील पोलिसांकडून उपलब्ध करून देण्यात आला. पुणे शहर पोलिसांनी मजुरांना त्यांच्या मूळ गावी जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत उपलब्ध करून दिली आहे. परिवहन मंडळाच्या मोफत बसेससह रेल्वे व खासगी बसच्या माध्यमातूनही शहरातील हजारो परप्रांतीय मजूर त्यांच्या मूळ गावी रवाना करण्यात येत आहेत.

पुणे शहरातील हजारो मजुरांना त्यांच्या मूळ गावी जाण्यासाठी पुणे शहर पोलीस दलाकडून मोठ्या प्रमाणात मदत उपलब्ध करून देण्यात येत असल्याने पुणे पोलिसांच्या या कार्याबद्दल परप्रांतीय मजूर आभार मानत आहेत.

Samana 04.05.20

# नागरिक घरात... पोलीस रस्त्यावर अन् चोरटे गायब

## लॉकडाऊनमुळे चार महिन्यांत पुण्यात तब्बल अकराशे गुन्ह्यांची झाली घट

पुणे, दि. ३ (प्रतिनिधी) - कोरोनामुळे लॉकडाऊन असल्यामुळे पुणे शहरातील गंभीर स्वरूपाचे गुन्हे घटले आहेत. नागरिक घरात आणि पोलीस रस्त्यावर असल्यामुळे चोरटे गायब झाले आहेत. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी मागील चार महिन्यांत पुणे शहरात गुन्ह्यांची संख्या तब्बल १ हजार ८९ ने घटली आहे. त्यामध्ये खून, घरफोडी, दरोडे, वाहनचोरी आणि फसवणुकीच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. चार महिन्यांत छोटे-दाखल आहेत.

तुलनेत एप्रिल २०१९ अखेर पुण्यात २ हजार ९९३ गुन्हे दाखल झाले होते. लॉकडाऊनमुळे सार्वजनिक ठिकाणी होणारी गर्दी कमी झाली आहे. शहरात संचारबंदी लागू करण्यात आली असल्याने पोलिसांचा तगडा बंदोबस्त आहे. गुन्हेगारीचा आलेख निम्म्याने घटला आहे. नागरिकांचे रस्त्यावरील येणे-जाणे कमी झाले आहे. पोलीस रस्त्यावर असल्याने दहशत पसरविणारे, करणारे, बसमध्ये चोऱ्या करणारे, वाहनचोरी करणाऱ्यांचा वावर कमी झाल्याने गुन्हेगारी कमी झाली आहे. लॉकडाऊन असल्याने एप्रिल महिन्यात शहरात फक्त ९ वाहनचोरीचे गुन्हे दाखल आहेत.

संचारबंदीचे उल्लंघन केल्यामुळे पोलिसांनी १८८ कलमानुसार नागरिकांवर गुन्हे दाखल केले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने विनाकारण घराबाहेर पडणे, मास्क न वापरणे, वाहन घेऊन भटकंती करणाऱ्या समावेश आहे. दारू, बिअर बार, हॉटेल बंद असल्यामुळे मद्यपान करून राडा घालण्याचे प्रकार बंद झाले आहेत. खून, खुनाचा प्रयत्न अशा गंभीर गुन्ह्यांमध्येही घट झाली आहे. दिवसा व रात्री बंद घरांची रेकी करून घरफोड्या करण्याचे प्रकार जवळपास थांबले आहे. शाळा, महाविद्यालये बंद असल्याने तरुणींच्या छेडछाडीच्या घटना थांबल्या असून, विनयभंग, बलात्कारांच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या

Lokmat 19.05.20

# पोलिसांच्या पुढाकाराने साडेअठरा हजार स्वगृही

पुणे : लॉकडाऊनमुळे शहरातच राहावे लागलेल्या तब्बल १८ हजार ५३७ परप्रांतीय बांधवांना पुणे पोलिसांच्या पुढाकाराने स्वगृही पाठविण्यात आले. कोरोनामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीत जाहीर केलेल्या लॉकडाऊनमध्ये पुणे शहरात अडकून पडलेले परप्रांतीय श्रमिक, विद्यार्थी आणि नागरिक यांना त्यांच्या गावी पाठविण्याची प्रक्रीया ९ मे पासून सुरु आहे. नुकतेच प्रयागराज-उत्तरप्रदेश या रेल्वेमधून १ हजार ५२० जणांना रवाना करण्यात आले. त्यात परिमंडळ 3 मधील पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या नागरिकांचा समावेश आहे. पुणे रेल्वे स्टेशन ते बिहार अशा रेल्वेची व्यवस्था करून अशा १ हजार ४५२ नागरिकांना रवाना करण्यात आले. त्यामध्ये परिमंडळ, २, ३, ४, ५ येथील नागरिकांचा समावेश होता. तिसरी रेल्वे ही पुणे स्टेशन ते मारवाड-पाली-जयपूर अशी राजस्थान येथे १ हजार ९३ नागरिकांना घेऊन रवाना झाली. आतापर्यंत १८ हजार ५३७ जण राज्यात रवाना करण्यात आले आहे.

## Sakal 30.05.20

# ...अन् आठवड्यात एकही नवा रुग्ण नाही

## पाटील इस्टेट झोपडपट्टीतील उद्रेक रोखण्यात यश

**पुणे, ता. २९ :** पॉसिटीव्ह... घरटी जीवनावश्यक वस्तूंचे किट... सर्वेक्षणात लक्षणे दिसताच तत्काळ तपासणी आणि क्वारंटाईन... सार्वजनिक स्वच्छतागृहात सेन्सर असलेले नळ, जागोजागी हात धुण्यासाठी साबण आणि वॉशबेसिन, अशा अनेक उपाययोजना पाटील इस्टेट झोपडपट्टीत राबविण्यात आल्या. त्यामुळे कोरोनाचा उद्रेक झालेली ही झोपडपट्टी आता मोकळा श्वास घेऊ लागली आहे. गेल्या आठ दिवसांमध्ये एकही नवा रुग्ण झोपडपट्टीत आढळलेला नाही.



या झोपडपट्टीत गेल्या ५८ दिवसांत कोरोनाने धुमाकूळ घातला होता. तब्बल १७२ रुग्ण आढळले होते. दिवसागणिक ही संख्या वाढतच होती. परंतु उपायुक्त [illegible] उदास यांनी राबविलेल्या उपाययोजनांमुळे आठ दिवसांत एकही नवा रुग्ण आढळून आला नाही. या उलट जनवाडी, गोखलेनगर, रामोशीवाडी, पांडवनगर झोपडपट्ट्यांमध्येही कोरोना बाधितांची संख्या वाढू लागली आहे.

पाटील इस्टेट झोपडपट्टीमध्ये राबविलेल्या उपाययोजनांबद्दल उदास म्हणाले, "झोपडपट्टीत रुग्ण आढळल्यानंतर तातडीने तेथील गल्लीबोळ बंद करण्याचा निर्णय घेतला. नागरिकांना घराबाहेर पडण्यास बंदी घातली. ड्रोन कॅमेऱ्यांच्या माध्यमातून तातडीने तपासणी सुरू करण्यात आली. विशेषतः साठ वर्षांवरील आणि अन्य आजारी नागरिकांच्या तपासणीला प्राधान्य देण्यात आले. लक्षणे आढळल्यास तातडीने संस्थात्मक क्वारंटाईन करून उपचार सुरू करण्यात आले. जागोजागी तात्पुरते वॉशबेसिन आणि हात धुण्यासाठी सॅनिटायझर व साबणाची सुविधा देण्यात आली. अशा अनेक छोट्या मोठ्या उपाययोजनांमुळे पाटील इस्टेट झोपडपट्टीतील कोरोनाचा उद्रेक नियंत्रणात आणण्यास मदत झाली."

### वसाहतीतील उपाययोजना

- सार्वजनिक स्वच्छतागृहांची दिवसातून पाच वेळा स्वच्छता
- स्वच्छतागृहात सेन्सर असलेले नळ बसविले, हॅंडवॉशची सुविधा
- मुख्य रस्त्यांवर तात्पुरते वॉशबेसिनची व्यवस्था
- वस्तीमध्ये दिवसातून दोनदा फवारणी
- झोपडीधारकांना घरपोच जीवनावश्यक वस्तूंचे किट

### उद्रेकाची नवी ठिकाणे

कामगार पुतळा, कासेवाडी ११, संगमवाडी, महात्मा गांधी वसाहत, रामोशीवाडी, जनवाडी, पांडवनगर, वडारवाडी या भागात कोरोना बाधितांची संख्या वाढू लागली आहे. या सर्व भागात मिळून सुमारे ११५ पेक्षा अधिक रुग्ण आढळून आले आहेत.

## Prabhat 11.05.20

# कौटुंबिक हिंसाचार घटले!

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १० - लॉकडाऊनमुळे सर्वजण घरात एकत्र आहेत. याची परिणिती पती-पत्नीतील वाद वाढण्यास झाली आहे. या कालावधीत देशात कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे निरीक्षण या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्थांनी नोंदविले आहे. राष्ट्रीय महिला आयोगानेदेखील अशा घटना वाढल्याचे म्हटले आहे. मात्र, पुणे शहरात पोलिसांच्या आकडेवारीवरून हे प्रमाण घटल्याचे दिसून येते.

यासंदर्भात शहरातील ३० पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यांची पडताळणी केली असता १० मार्च ते २५ एप्रिल या काळात केवळ १७ गुन्हे दाखल झाले. दरम्यान, याच कालावधीत मुख्य नियंत्रण कक्षाला कौटुंबिक हिंसाचाराबाबत १७३ कॉल आले. तर, राष्ट्रीय महिला आयोगाकडून लॉकडाऊन कालावधीत १० तक्रार



अर्ज पोलिसांना प्राप्त झाले आहेत. एक जानेवारी ते २५ एप्रिल या चार महिन्यांत शहरातील विविध पोलीस ठाण्यांत कौटुंबिक हिंसाचाराचे १०० गुन्हे दाखल आहेत, तर २ हजार ८५२ अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद आहे. तसेच २९४ तक्रार अर्ज आले आहेत. लॉकडाऊन कालावधीत दाखल गुन्हे व तक्रार अर्जांचा विचार केला तर १० मार्च ते २५ एप्रिल या सहा आठवड्याच्या काळात केवळ १७ गुन्हे दाखल झाले आहेत. तर ८०८ अदखलपात्र गुन्हे असून, ८२ तक्रार अर्ज मिळाले आहेत. त्यामुळे हे प्रमाण इतर कालावधीच्या तुलनेत कमी आहे. लॉकडाऊनमुळे कमाईचे साधन बंद झाले आहे. त्यामुळे आर्थिक

> इतर कालावधीच्या तुलनेत सध्या कौटुंबिक हिंसाचाराबाबतीत दाखल तक्रारींचे प्रमाण कमी आहे. भरोसा सेलच्या माध्यमातून महिलांच्या तक्रारींचे निवारण केले जात आहे. लॉकडाऊन कालावधीत दूरध्वनीच्या माध्यमातून महिलांना मदत केली जाते. या काळात मदत मागितलेल्या ४५ महिलांच्या समस्यांचे निराकरण केले आहे.
>
> – अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे

| महिना | दखलपात्र गुन्हे | अदखलपात्र गुन्हे | तक्रार अर्ज |
|---|---|---|---|
| १ जाने. ते ९ मार्च | ८३ | २०४४ | २१२ |
| १० मार्च ते २५ एप्रिल | १७ | ८०८ | ८२ |
| एकूण | १०० | २८५२ | २९४ |

अडचणींचा सामना करावा लागत आहे. या कालावधीत महिलावर्ग पूर्णवेळ घरातच असल्यामुळे त्यांना शारीरिक व मानसिक त्रासाला तोंड द्यावे लागत आहे. लॉकडाऊनच्या काळात महिला तक्रार देण्यासाठी प्रत्यक्ष पोलीस ठाण्यात येता येत नाही. मात्र, भरोसा सेलच्या हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करून मदत मागत आहेत. अशा तक्रारदार महिला व त्यांच्या घरच्यांचे दूरध्वनीद्वारे सेलच्या सहायक पोलीस निरीक्षक स्वाती केदार यांनी समुपदेशन करून समस्यांचे निराकरण केले आहे. तर याच काळात भरोसा सेल येथील महिला सहायक कक्षाकडे ९२ तक्रार अर्ज मिळाले आहेत. तर राष्ट्रीय महिला आयोगाकडून आलेले १० तक्रार अर्ज आहेत असे एकूण १३२ तक्रार अर्ज एक खिडकीद्वारे प्राप्त झाले आहेत.

## Pudhari 01.05.20

# लॉकडाऊनमध्ये कौटुंबिक हिंसाचाराचे फक्त १७ गुन्हे

## इतर कालावधीच्या तुलनेत पुण्यात तक्रारींचे प्रमाणही घटले; राष्ट्रीय महिला आयोगाकडून १० तक्रारी, मुख्य नियंत्रण कक्षाला १७३ कॉल

पुणे : अशोक मोराळे


पुढारी विशेष

[illegible]

### ४५ महिलांना 'भरोसा'

[illegible]

[illegible]



| महिना | दखलपात्र दाखल गुन्हे | अदखलपात्र गुन्हे | तक्रार अर्ज |
|---|---|---|---|
| ०१ जाने. ते ०९ मार्च | ८३ | २०४४ | २१२ |
| १० मार्च ते २५ एप्रिल | १७ | ८०८ | ८२ |
| एकूण | १०० | २८५२ | २९४ |

**Sakal 11.05.20**

## » पुणे शहरातील बाधित क्षेत्र

१) मंगळवार पेठ : जुना बाजार
२) पर्वती दर्शन : परिसर १
३) पर्वती दर्शन : परिसर २
४) पर्वती चौक झोपडपट्टी
५) पर्वती : दांडेकर पूल
६) पर्वती : दत्तवाडी
७) पर्वती : इंदिरानगर झोपडपट्टी नीलामय टॉकीज १
८) पर्वती : इंदिरानगर झोपडपट्टी नीलामय टॉकीज २
९) भवानी पेठ, नाना पेठेतील शहराचा मध्यवर्ती भाग
१०) कोंढवा बुद्रुक : काकडेवस्ती
११) कोंढवा बुद्रुक : नॉटिंग हिल सोसायटी
) होलेवस्ती उंड्री
) सुखसागरनगर, अंबामाता मंदिर परिसर
१४) कोथरूड : शिवतारा इमारत बधाई स्वीटजवळ
१५) कोथरूड : चंद्रगुप्त सोसायटी
१६) पुणे स्टेशन
१७) शिवाजीनगर : रेल्वे स्टेशन
१८) घोरपडी, बालाजीनगर, विकासनगर
१९) पर्वती : तळजाई वस्ती १
२०) पर्वती : तळजाई वस्ती २
२१) धनकवडी : बालाजीनगर
२२) पर्वती : शिवदर्शन १
२३) पर्वती : शिवदर्शन २
२४) धनकवडी - गुलाबनगर, चैतन्यनगर
२५) आंबेगाव खुर्द
२६) वडगाव शेरी : टेम्पो टेम्पो चौक
३३) बिबवेवाडी : स. नं. ६५९
३४) गुल्टेकडी : सेव्हन डे ॲडव्हेंटीज मिशन
३५) बिबवेवाडी : ढोलेमळा झोपडपट्टी,
३६) बिबवेवाडी : प्रेमनगर
३७) येरवडा : गांधीनगर
३८) येरवडा : गांधीनगर २
३९) येरवडा : ताडीगुत्ता
४०) येरवडा : नागपूर चाळ
४१) येरवडा : आदर्श इंदिरानगर
४२) येरवडा : फुलेनगर
४३) कळस जाधववस्ती
४४) येरवडा : प्रभाग क्र.६
४५) हडपसर : रामनगर
४६) हडपसर : रामटेकडी
४७) हडपसर : गोसावीवस्ती वैदूवाडी
४८ ) हडपसर : सय्यदनगर १
४९) हडपसर : सय्यदनगर २
५०) हडपसर : सय्यदनगर ३
५१) हडपसर : गुलामअलीनगर
५२) कोंढवा खुर्द : शिवनेरीनगर
५३) कोंढवा खुर्द : भाग्योदयनगर
५४) कोंढवा खुर्द : तांबोळी बाजार
५५) कोंढवा खुर्द : मिठानगर
५६) वानवडी : एसआरपीएफ
५७) शिवाजीनगर : कामगार पुतळा
५८) शिवाजीनगर : महात्मा गांधी झोपडपट्टी
५९) शिवाजीनगर : पाटील इस्टेट
६०) शिवाजीनगर : रेल्वे लाइन
६१) शिवाजीनगर : न. ता. वाडी
६२) कामगार आयुक्त

# कोरोनाबाबत पुणे पोलिस हुशार



## बी.जे.वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्वेक्षणातील निष्कर्ष

**पांडुरंग सरोदे : सकाळ वृत्तसेवा**

**पुणे, ता. १० :** बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय व ससून रुग्णालयाच्या बालरोग चिकित्साशास्त्र विभागाने केलेल्या सर्वेक्षणात ९८.५ टक्के पोलिसांना कोरोनाबाबत चांगले ज्ञान असल्याचे समोर आले आहे. परंतु, अनेक नागरिक लॉकडाउनच्या नियमांकडे दुर्लक्ष करीत असल्याने पोलिसांवरील ताण वाढत असल्याचे निरीक्षण ४२ टक्के पोलिसांनी नोंदविले आहे. कोरोनामुळे १२४ पोलिस अधिकारी व कर्मचारी कुटुंबापासून दूर राहत असल्याची बाबही यातून पुढे आली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात ८ हजार ६५१ पैकी ५ हजार ६९२ (६६ टक्के) पोलिसांनी सहभाग घेतला. ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.मुरलीधर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली बालरोग विभागाच्या विभागप्रमुख व प्राध्यापक डॉ.आरती किणीकर, सहायक प्राध्यापक डॉ.नरेश सोनकवडे आणि त्यांच्या ७ ते ८ जणांच्या पथकाने 'कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांचे ज्ञान, दृष्टिकोन व सेवा हा विषय घेऊन अभ्यासात्मक सर्वेक्षण केले.

### सर्वेक्षणातून समोर आलेल्या बाबी

- नागरिक नियमांचे पालन करीत नसल्याचे २ हजार ३४४ (४२ टक्के) पोलिसांचे मत
- नागरीकांनी शिवीगाळ करीत हल्ला केल्याची २४ पोलिसांची (५ टक्के) माहिती
- नागरिकांकडूनही पाच पोलिसांविरुद्ध तक्रार
- स्वयंसेवी संस्थांकडूनही सामाजिक अंतराच्या नियमाचे उल्लंघन
- कोरोनाबाबत ९८.५ टक्के पोलिसांना चांगले ज्ञान
- प्रशासनाकडून मिळणाऱ्या सुविधांबाबत ९५ टक्के पोलिस समाधानी
- कुटुंबीयांनी संसर्ग होऊ नये यासाठी ९६ टक्के पोलिसांकडून काळजी

### कोरोनाचा पोलिसांना बसणारा फटका


- वाहतूक सुविधा नसल्याने गैरसोय होत असल्याचे ४३२ (८ टक्के) पोलिसांचे मत
- कोरोनामुळे २९७ (५ टक्के) पोलिसांना चहा, नाश्ता व जेवण नाही
- स्वच्छतागृहांचा अभाव असल्यामुळे महिला पोलिसांची गैरसो
- किराणा किंवा अन्य वस्तू आणण्यास ३६५ कर्मचाऱ्यांना अडचण
- दवाखाने, खासगी रुग्णालये खुले नसल्याचा १०४ जणांना फटा
- वाहने दुरूस्त करण्याची ७० पोलिसांना समस्या
- पगार कमी आल्याने ३५ पोलिसांना अडचण

**"या सर्वेक्षणात ९८.५ टक्के पोलिस कोरोनाबाबत जागरुक असल्याचे स्पष्ट झाले आहे. स्वतः व कुटुंबाला कोरोना संसर्ग होऊ नये, यासाठी ९६ टक्के पोलिसांकडून काळजी घेतली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.**
**- डॉ.के.वेंकटेशम,** पोलिस आयुक्त, पुणे

**"नागरिकांकडून लॉकडाउनच्या नियमांचे पालन केले जात नसल्याने पोलिसांवरील ताण वाढत आहे. महिला पोलिस कुटुंबाबात काळजी करत असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले.**
**- डॉ. आरती किणीकर,** प्राध्यापक व विभागप्रमुख, बालरोग चिकित्साशास्त्र विभाग

# लंडनहून आलेले प्रवासी सशुल्क क्वारंटाइन

**औंध, ता. १० :** लॉकडाउनमुळे लंडनमध्ये अडकलेल्या पुणे शहर व जिल्ह्यातील ६५ जणांना विमानाने मुंबईपर्यंतचा नऊ तासांचा प्रवास करून आल्यानंतर मुंबई विमानतळावर पहाटे दीड ते आठ वाजेपर्यंत प्रवाशांना एका हॉटेलमध्ये नेण्यात आले. तेथील खर्चाबाबतही स्पष्ट माहिती न देता, प्रत्येकाला एका खोलीत राहण्यासाठी



**Prabhat 23.06.20**



# ‘खाकी’तील करोना योद्धा...

## जीव धोक्यात घालून २४ तास पोलीस ऑनड्युटीवर

संजय कडू

पुणे, दि. २२ - करोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर 'साथ रोग नियंत्रण' कायदा लागू झाला आहे. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्त हे यासंदर्भात वेळोवेळी बैठका घेऊन अमंलबाजवणीच्या सूचना देत असतात. पोलिसांचे काम त्यांच्या सूचनांचे पालन करणे इतकेच असते.

सध्या, शहरातील अनेक भाग कंटेन्मेंट झोनमधून वगळण्यात आला आहे. शहरातील बाजारपेठा आणि वाहतूकही सुरळीत करण्यात आली आहे. पोलिसांना ठिकठिकाणचे बॅरिकेट आणि बंदोबस्त हटवण्यास सांगण्यात आले आहे. मास्क न घालणाऱ्यांवरही कारवाईचे अधिकारही महापालिकेच्या यंत्रणेकडे आहेत. यामुळे मागील तीन महिने करोनाला रोखण्यासाठी जीवाचे रान करणारी पोलीस यंत्रणा सध्या रस्त्यावर कमी प्रमाणात दिसत आहे. मात्र, कंटेनमेंट झोनमध्ये अद्यापही पोलीस जीव धोक्यात घालून बंदोबस्त करत आहेत.

शहरात कायदा सुवस्था राखतानाच करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याची जबाबदारी मे महिन्यापर्यंत पोलिसांच्या खांद्यावर होती. नागरिकांना घराबाहेर पडू न देणे, जीवनावश्यक वस्तू वगळता इतर दुकाने बंद ठेवणे, भाजीपाला विक्रेत्यांवर नियंत्रण ठेवणे, ई पास शिवाय प्रवासाला बंदी घालणे, वाहने विनाकारण घेऊन फिरणाऱ्यांवर कारवाई करणे इतकेच नव्हे तर घराबाहेर पडणाऱ्यांना समज देणे, आदी सर्व जबाबदारी पोलिसांवर होती. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्त जस जसे आदेश लागू करत होते, त्या सर्वांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलिसांवर होती. यानंतर मे महिन्याच्या अखेरीपासून अनेक बंधणे शिथील करण्यात आली. कंटेनमेंट झोन वगळता उर्वरीत सर्व परिसर व्यवहारांसाठी नियमांतर्गत खुला करण्यात आला. सध्या, वेळेचे आणि समविषम तारखांचे बंधन घालून व्यवहार सुरू आहेत. यामुळे पोलिसांना फक्त कंटेन्मेंट झोनमध्येच बंदोबस्ताचे काम राहिलेले आहे. शहरातील उर्वरित भागात ध्वनिक्षेपकावरून मास्क लावण्यासंदर्भात आणि खरेदीसाठी सोशल डिस्टन्स ठेवण्यासंदर्भात पोलीस सूचना करीत आहेत.

दरम्यान, मागील तीन महिने पोलिसांचा रस्त्यावर खडा पहारा होता. तसेच, अनेक करोना विषाणूचे संक्रमण झालेल्या परिसरातही गस्त होती. इतर प्रशासकीय यंत्रणेपेक्षा पोलिसांचा सर्वसामान्य नागरिकांशी जास्त संपर्क होता. यामुळे पोलीस दलातील अनेकांना करोनाची लागण झाली. एक, दोन पोलीस ठाणी वगळता जवळपास सर्वच पोलीस कर्मचाऱ्यांना क्वारंटाइन करण्याची वेळ आली. एका पोलीस अधिकाऱ्यासह तीन पोलीस कर्मचाऱ्यांना करोनामुळे आपले प्राण गमवावे लागले आहेत. करोना मुक्तीसाठी शहीद झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना पुणेकर कधीही विसरू शकणार नाहीत.

**Prabhat 06.06.20**



# गर्भवतीला एका तासात प्रवास पास

## पुणे पोलिसांची तत्परता : अनेकांना सुखद अनुभव

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ५ - गर्भवती महिलेला शस्त्रक्रियेसाठी चेन्नईला जाणे गरजेचे होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी फक्त एकाच तासात तिचा प्रवास अर्ज मंजूर केला. यामुळे गर्भवतीला अगदी वेळेत चेन्नईला जाता आले.

संबंधित महिलेच्या गर्भाशयात जुळी मुले असून त्यांची नाळ एकच आहे. त्यामुळे त्रास होत असल्याने त्याबाबतची शस्त्रक्रिया करणे गरजेचे होते. मात्र, ही शस्त्रक्रिया केवळ चेन्नईत होते. त्यामुळे पुण्यातून चेन्नईला प्रवास कसे जायचे आणि त्यासाठी पास वेळेत मिळणार का? असा प्रश्न तिला पडला. पण, पोलिसांनी कर्तव्यदक्षता दाखवल्याने महिलेला वेळेत उपचार घेणे शक्य झाले. यावर तिने पोलिसांचे आभारही मानले. संबंधित महिला लोहगाव येथून एअर ॲम्बुलन्सने चेन्नईतील रुग्णालयात दाखल झाली.

### कॅन्सरग्रस्त चिमुकल्यालाही दिलासा

कॅन्सरवरील शस्त्रक्रियेसाठी एका ६ वर्षीय मुलाला जयपूरला जाणे गरजेचे होते. त्यालादेखील पोलिसांनी त्वरित पास उपलब्ध करून दिला. त्यामुळे त्याला वेळेत उपचार घेणे शक्य झाले. तर, मेंदूचा कॅन्सर असलेल्या ४५ वर्षीय व्यक्तीवर उपचार करण्यासाठी डॉक्टर पुण्यात येऊ न शकल्याने संबंधित रुग्णास जयपूरला जाण्यासाठी पास उपलब्ध करून देण्यात आला. नागपूरला जाणे गरजेच्या असलेल्या महिलेलादेखील असाच अनुभव आला.

“वैद्यकीय कारणांचे अर्ज त्वरित मंजूर करण्यास सुरुवातीपासून प्राधान्य दिले आहे. आजार व गरज लक्षात घेता १२ हजार ७५५ अर्ज एका तासातच मंजूर करण्यात आले. त्यानंतरचे वैद्यकीय अर्ज पुढील चार तासांत देण्यात आले. त्यामुळे या सर्वांना वेळेत उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

– बच्चन सिंग, पोलीस उपायुक्त, गुन्हे शाखा

**23,106**
वैद्यकीय कारणांसाठी आलेले अर्ज

**12,755**
तासाभरात मंजूर अर्ज

| आजार | आलेले अर्ज | मंजुरी |
|---|---|---|
| कॅन्सर | ६,४०३ | ५७% |
| आयसीयू | २,७४१ | ४३% |
| मधुमेह | २,७८४ | ४१% |
| लहान मुले | १,८५६ | ४१% |
| गर्भवती महिला | ८,४३३ | ४१% |
| डायलेसिस | ३,८८६ | ५७% |

**Sakal 21.03.20**



**Samana 23.03.20**

नवनाथ शिंदे

# पोलिसांच्या कामगिरीला सलाम

